# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २६ मार्च/२०२३ (रविवार)

---

## दुखापत

पोलीस स्टेशन भिवापुर :— अंतर्गत मौजा थुटान बोरी जुनी १२ किमी, येथे फिर्यादी व आरोपी एकाच गावातील रहीवासी असुन दिनांक २५/०२/२३ चे १०/०० वा दर. फिर्यादी हा आपले घरासमोर उभा असता आरोपी नामे— **भास्कर फत्तु शेंन्डे रा थुटान बोरी जुनी** याने आपले हातात कु—हाड घेवुन आला व म्हणाला की "तु तुझ्या बायकोला माझ्या चुगल्या का सांगितल्या" या कारणावरून चिडुन आरोपीने त्याचे हातातील कु—हाडीने **फिर्यादीच्या डोक्याला कु—हाडीचा लाकडी दांडा मारल्यामुळे जखम** झाली आहे. फिर्यादीने आरोपीला थांबविण्याचा प्रयत्न केला असता, आरोपीने फिर्यादीलाच शिवीगाळी करून जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— रघुनाथ रतिराम कामडी वय ६२ वर्ष रा थुटान बोरी जुनी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे नमुद आरोपीविरूध्द कलम ३२४,५०४ ,५०६ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो हवा भुरे मो नं ८६००६५०६०७ हे करीत आहे.